रोजगार हमी योजना प्रभागाच्या अधिकृत सेवांमध्ये GPR नुसार सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग (रोहयो)**
**शासन निर्णय क्रमांक: जीपीआर-२०२५/प्र.क्र.७०/रोहयो-१२**

१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०२६

**वाचा:-**

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-१७२५/प्र.क्र.१२६/मातं,दि.३०.०५.२०२५.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि.०३.०८.२०२६.
३) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील "राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) समितीच्या" दि. ०५.१०.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

राज्य शासनाच्या विविध सेवा व योजना नागरिकांना अधिक पारदर्शक, सुलभ व पूर्णतः डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी **शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering - GPR)** उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर, रोजगार हमी योजना प्रभागाच्या सेवा आणि योजनांमध्ये गतिमानता आणण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली **दि. ०५ ऑक्टोबर, २०२६** रोजी राज्यस्तरीय GPR समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेअंती व उच्च अधिकार समितीच्या (HPC) शिफारशींनुसार, **विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G)** अंतर्गत महत्त्वाच्या सुधारणा लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering - GPR) समितीने दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मंजुरीला अनुसरून, रोजगार हमी योजना प्रभागांतर्गत खालीलप्रमाणे सुधारित मार्गदर्शक तत्त्वे व अंमलबजावणीची कार्यपद्धती विहीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | बैठकतील निरिक्षणे / नियोजन विभागाच्या सूचना | मा. मुख्य सचिव यांनी दिलेले निर्देशानुसार करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | विकसीत भारत- रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G) योजनेतंर्गत येणाऱ्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजनांसाठी | विकसीत भारत- रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G) योजनेची अंमलबजावणी |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यक असलेल्या सर्व नमुना अर्जाचे (Form) संगणकीकरण (Digitization) करून महासारथीशी लिंक करण्यात यावेत. | दिनांक ०१.०७.२०२६ पासून करण्यात येत असून त्यानुषंगाने केंद्र शासनामार्फत योजनेचे नियम अधिसूचित करण्यात येत आहे. सदर योजनेचे सर्व नियम केंद्र शासनामार्फत अधिसूचित झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत योजनेअंतर्गतच्या लाभासाठी नमूना अर्जाचा मसूदा तयार करुन त्याचे संगणकीकरण (Digitization) व तद्नंतर सदर अर्ज व जॉबकार्ड महासारथी पोर्टलवर उपलब्ध करण्यात येईल. |
| २ | सदर योजनांचे संगणकीकरण झाल्यानंतर अर्ज महासारथी वर घेण्यात यावे. | |
| ३ | वैयक्तिक लाभांची माहिती महासारथी वर घेण्यात यावी. | |
| ४ | रोहयो प्रभागाकडून वितरीत केले जाणारे Job Card महासारथी या संकेतस्थळाशी Auto Fetch द्वारे लिंक करण्यात यावे. | |
| ५ | रोहयो प्रभागाने आजतागायत निर्माण केलेल्या सर्व अचल संपत्तींचे GEO Tagging करून त्याची नोंद MH-UID या संकेतस्थळावर घेण्यात यावी. तसेच रोहयो प्रभागाने निर्माण केलेल्या विहिरींचेही GEO Tagging करून त्याची नोंद MH-UID या संकेतस्थळावर घेण्यात यावी. | मनरेगा योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या मत्तांची काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असताना व काम झाल्यानंतर असे तीन टप्प्यात जीओ टॅगिंग करण्यात आले असून सदर विदा नरेगा सॉफ्ट प्रणालीवर उपलब्ध आहे. सदर विदाची (Data) API द्वारे MH-UID या संकेतस्थळावर नोंद करुन घेण्याची कार्यवाही आयुक्त, विकसीत भारत-रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G) यांनी करावी. |
| ६ | रोहयो प्रभागाने ज्या विहिरी, शेततळे, कुपनलिका इ. कामे हाती घेतली आहेत किंवा पुर्ण केली आहेत त्यांची नोंद महसुल विभागाच्या ७/१२ असलेल्या संकेतस्थळाशी Auto Fetch द्वारे लिंक करण्यात यावी. | मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या वैयक्तिक लाभाची कामे ज्या शेत जमीनीवर घेण्यात आले आहेत अशा शेतजमीनीच्या इतर हक्क सदरी मत्तेची नोंद घेण्यात येते. तथापि, सदर नोंदी Auto Fetch द्वारे होण्यासाठी महसूल विभागाच्या समन्वयाने दिनांक ३०.११.२०२६ पर्यंत SOP तयार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ७ | विकसीत भारत- रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G) योजनेतंर्गत येणाऱ्या नवीन कामांची पीएम गती शक्ती या संकेतस्थळावर नोंद घेण्यात यावी. | विकसीत भारत- रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G RAM G) योजनेअंतर्गातील कामे PM Gati-Shakti पोर्टलवर घेण्याबाबत योजनेत तरतूद आहे. याबाबत केंद्र शासनामार्फत SOP उपलब्ध झाल्यानंतर SOP नुसार पीएम गती शक्ती या पोर्टलवर कामांची नोंद घेण्यात येईल. |
| ८ | भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे (GSDA) उपलब्ध असलेल्या अहवाल आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) यांच्याकडील माहितीचा समावेश रोहयो प्रभागातंर्गत राबविल्या जाणाऱ्या जलसंधारणाबाबतच्या कामांबाबत तसेच गाव विकास आराखड्यात (VDP - Village Development Plan) समाविष्ट असलेली कामांबाबत उपयोगात आणला जावा. | VB-G RAM G योजनेअंतर्गत कामांचे नियोजन युक्तधारा या ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येत असून सदर प्रणाली अंतर्गत कामांचे नियोजन Geo Spatial Indicators विचारात घेवून करण्यात येते. यासंदर्भात GSDA कडील माहिती आणि युक्तधारा पोर्टलवरील माहिती यामध्ये सुसंगती असल्याची खातरजमा करुन कामांचे नियोजन करण्यात येईल. |
| ९ | रोहयो प्रभागामार्फत निर्माण केल्या गेलेल्या शेत पाणंद रस्त्यांना एक युनिक आयडी (MH-UID) देण्यात यावा आणि त्याचे मॅपिंग गतीशक्ती पोर्टलवर Polygon स्वरूपात करण्यात यावे. | मनरेगा योजनेअंतर्गत तयार झालेल्या पाणंद रस्ता व इतर सर्व मत्तांचे Geo Fencing नरेगा सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आलेले आहे. नरेगा सॉफ्ट प्रणालीवरील पाणंद रस्त्यांच्या कामांचे API द्वारे MH-UID पोर्टलवर युनिक आयडी तयार करुन Geo Tagging च्या विदेनुसार (Data) अचल संपत्तीचे MH-UID तयार करण्यात येईल. |
| १० | प्रत्येक ग्रामपंचायतीने विकसीत भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन (ग्रामीण) (VB-G | VB-G RAM G योजनेअंतर्गत ३७५ विविध प्रकारची वैयक्तिक, सामुहिक व सार्वजनिक कामे अनुज्ञेय असून संबंधित ग्रामपंचायतीस आवश्यक त्या कामांचा |

| | | |
|---|---|---|
| | RAM G) योजनेतंर्गत दर्शविलेल्या ३१८ कामांचा प्राधान्य क्रम ठरवून मास्टर प्लॅन तयार करावा. | संपृक्तता (Saturation Based) आधारीत VGPP (Village Gram Panchayat Plan) युक्तधारा पोर्टलवर करण्यात येतो. त्यानुसार योजनेतंर्गत ३७५ अनुज्ञेय कामांचा प्राधान्य क्रम संबंधित ग्रामपंचायतीमार्फत निश्चित करण्यात यावा. |

०२. रोहयो प्रभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सेवा (G2B) व योजना (G2C) बाबतचे आदेश शासन मान्यतेने स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००९१९३७०९५०२६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by KAILAS TARACHAND SALUNKE
Date: 2026.10.09 19:38:01 +05'30'

**(कैलास साळुंके)**
**सह सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व योग्य त्या कारवाईसाठी रवाना:**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. मा. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,

१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१६. आयुक्त, महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन ग्रामीण). (VB-G RAM G),
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (VB-G RAM G),
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्हा परिषद (VB-G RAM G),
२०. सर्व उप जिल्हाधिकारी (VB-G RAM G),
२१. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (VB-G RAM G),
२२. सर्व तहसिलदार
२३. सर्व गट विकास अधिकारी
२४. निवडनस्ती (रोहयो-१२).